## नि.फौ.खटला क्र. ८५/२०२३ मधील नि. १९ वरील आदेश

(CNR No. MHRT080006712023)

०१. सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ अन्वये अर्जदार श्री. शांताराम सावजी बेलकर यांनी दाखल केला आहे. या प्रकरणातील (देवरुख पोलीस ठाणे, गु. र. नं. १३२/२०२३) जप्त मुद्देमाल – १५ किलो वजनाची पितळी धातुची घंटा परत मिळणेसाठी त्यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे विनंती केली आहे.

०२. अर्जदाराचे कथन असे आहे की, वर नमूद पितळी घंटा ही मौजे दाभोळे, बेलकरवाडी येथील श्री. निनाई देवी मंदीरातील आहे. अर्जदार हा सदर मंदीरातील मानकरी आहे. सदर निनाई देवी मंदीरातील सामानाची जबाबदारी त्याच्यावर आहे. तसेच मंदीराची देखभाल, पुजापाठ व मंदीराची साफसफाई या जबाबदाऱ्या सुध्दा अर्जदार यांच्यावर आहे. सदरची घंटा दिनांक २३/०७/२०२३ रोजी चोरी झाली होती. त्याबाबत प्रस्तुत अर्जदाराने दिलेल्या फिर्यादवरुन प्रस्तुतचा अपराध नोंद करण्यात आला. तपासा दरम्यान आरोपींकडून सदर घंटा हस्तगत करण्यात आली. मंदीराची सदर घंटा मंदीराकरीता परत मिळण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुत अर्जान्वये विनंती केली आहे.

०३. वारंवार संधी देवूनही आरोपींनी प्रस्तुत अर्जाबाबत काही म्हणणे सादर

केले नाही. तसेच या प्रकरणातील तपास अधिकारी यांनी निशाणी २८ कडे त्यांचे म्हणणे सादर करुन सदरची घंटा अर्जदारास योग्य त्या अटीशर्तीवर परत करण्यास हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

**०४.** विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी यांनी म्हणणे दाखल केले की, प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल हा साक्षी पुराव्याचा भाग असल्याने सदरचा मुद्देमालामध्ये कोणताही बदल करणे, त्रयस्थ व्यक्तीला न विकणे या योग्य त्या अटीशर्तीवर परत देणेस हरकत नाही.

**०५.** याकामी अर्जदारतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. जी. आर. गाणू व सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** प्रस्तुत प्रकरणात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. दोषारोपासोबत नमूद कागदपत्रांच्या प्रती दाखल करण्यात आल्या आहेत. अर्जदार यांनी सदरहु अर्जात मागणी केलेला मुद्देमाल हा उपरोक्त मंदीराखेरीज इतर कोणाच्या मालकीचा अथवा कब्जातील होता अगर आहे असे कोणाचेही म्हणणे नाही. तसेच अर्जदार हा सदर मंदीराचा मानकरी असून त्याच्यावर तो सांगत असलेल्या जबाबदाऱ्या असल्याचे त्याचे म्हणणे कोणीही नाकारलेले नाही. त्याबाबत अर्जदाराने निशाणी २० कडे त्याचे स्वतःचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्याचप्रमाणे, निशाणी २१ कडे गणपत बेलकर यांनी

त्याबाबत त्यांचे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

**०७.** प्रस्तुतचे प्रकरण आता सुनावणीच्या स्थीतीवर आहे. प्रकरणाची, चौकशी व संपरीक्षा प्रलंबित असताना कोणताही जप्त मुद्देमाल हा निष्फळ होवू नये याकरीता दरम्यानच्या कालावधीत तो मुद्देमाल संबंधीत हक्कदार व्यक्तीच्या ताब्यात देण्यात यावा, असे आपल्या कायद्याचे स्थापीत तत्व आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त घंटा ही पोलीस ठाण्यात ठेवून काहीही साध्य होणार नाही. सबब, कलम ४५१ अन्वये प्रकरणाच्या चौकशी प्रकरणात जप्त असलेला मुद्देमाल संबंधीत इसमास देण्याबाबतचे तत्व लक्षात घेता अर्ज मंजूर होणेसारखा आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज मंजुर करण्यात आला.

**०२.** अर्जदार शांताराम सावजी बेलकर यांना जप्त मुद्देमाल १५ किलो वजनाची पितळी धातुची घंटा ही श्री. निनाई देवी मंदीर, दाभोळ, बेलकरवाडी करीता द्यावी.

**०३.** अर्जदार यांच्या ताब्यात सदरची घंटा देण्यापूर्वी त्यांनी सदर घंटेबाबत इतर कोणाचे हक्क अथवा अधिकार दिसून आल्यास त्याबाबत त्या इसमाला न्यायालय सांगेल तितक्या रक्कमेसाठी नुकसान भरपाई देण्याची हमी देवून त्याबाबत रक्कम रुपये

१५,०००/– चे बंधपत्र (Indemnity bond) या न्यायालयात दाखल करावे.

**०४.** देवरुख पोलीस ठाणेचे अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वरील प्रमाणेची पूर्तता झाल्यावर, जप्त मुद्देमाल १५ किलो वजनाची पितळी धातुची घंटा बाबत तिच्या ओळखीकरीता सविस्तर पंचनामा करुन ती घंटा अर्जदार शांताराम सावजी बेलकर यांच्या ताब्यात द्यावे.

**०५.** वरीलप्रमाणेचा पंचनामा या प्रकरणी सादर करावा.

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.04.18 16:35:47 +0530

देवरुख **(ब. द. तारे)**

दि. १८ /०४/२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग – १ देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order in ( Order below Exh.19 in RCC No. 85/2023)

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 18/04/2024 |
| Order signed by PO. on | :- | 18/04/2024 |
| Order uploaded on | :- | 18/04/2024 |